## ऋणनिर्देश

मानवी साधनसंपत्तीचा विकास हे शिक्षणाचे प्रमुख तत्त्व आहे. पण आज राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणा-या विविध प्रवृत्ती म्हणजे भाषाभेद, धर्मभेद, दहशतवाद या प्रवृत्तीमध्ये परिवर्तन होणे गरजेचे आहे. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अभ्यासक्रमात दहा गाभाभूत घटकांचा समावेश आहे. गाभाभूत घटक ही संकल्पना विविधतेतील एकता जपण्याच्या गरजेतूनच आली. आधुनिकीकरणाच्या स्पर्धेत टिकून रहावयाचे असेल तर आपण जे उत्पादन करतो त्याचा दर्जा उच्च असणे अत्यंत आवश्यक आहे. हा दर्जा फक्त वस्तुंच्या बाबतीतच नव्हे तर आपली मूल्य, नैतिकता, आचार-विचार कृती याबाबतीत सुद्धा उच्च असणे गरजेचे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील या वैशिष्टयांचा विचार करून गाभाघटकाचे विकसन करण्यासाठी कृतीकार्यक्रम संशोधकाने राबविला आहे.

विद्यावाचस्पती स्तरावरील संशोधनकार्य अत्यंत अवघड स्वरूपाचे असते. या बिकट मार्गावर मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाशिवाय मार्गक्रमण करणे अशक्य आहे. आदर्श महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. माधवी नवले यांनी जे अमूल्य मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले केवळ त्याचमुळे प्रस्तुत संशोधन पूर्ण होऊ शकले.

एक स्त्री म्हणून नोकरी करताना व इतर कामकाज करताना कौटुंबिक जबाबदाऱ्या टाळता येतच नाहीत. परंतू कुटुंबातील व्यक्तींचा पाठिंबा, सहकार्य व प्रोत्साहन मिळाले म्हणूनच हे काम करणे मला शक्य झाले. त्यांचे औपचारिक आभार मानते पण त्यांचे ऋण कधीही व्यक्त होऊ शकणार नाही.

मी ज्या संस्थेत कामकाज करते त्या संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष मा. श्री. अनंतरावजी थोपटे व मानद सचिवा मा. सौ. निर्मलाताई थोपटे यांचे ही प्रगतीसाठी असणारे प्रोत्साहन आम्हाला कार्य करण्यासाठी नेहमी मार्गदर्शक ठरले आहे. त्यांचीही मी अत्यंत ऋणी आहे. तसेच सौ. निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्मिता काळे यांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन व भीतीयुक्त आदरच या संशोधन कार्यासाठी उपयुक्त ठरला त्यांचे ही ऋण व्यक्त करणे माझे कर्तव्य आहे. तसेच सहकारी प्राध्यापक वर्ग, कर्मचारी वर्ग व ग्रंथपाल श्री. कोंडे सर या सर्वांचा प्रस्तुत संशोधनासाठी महत्त्वपूर्ण वाटा आहे. त्यांचीही मी अत्यंत ऋणी आहे.

संशोधन कार्यातील महत्वाचा भाग म्हणजे साधन निर्मिती होय. ती करीत असताना तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ.संजीव सोनवणेसर त्याचप्रमाणे डॉ.साळी व.झा., डॉ.भितांडे वि.रा., डॉ.काळे स्मिता व डॉ.देव नेहा यांनी त्यांच्या कामकाजातील अमूल्य वेळ मला दिला व योग्य मार्गदर्शन केले. त्यांचे सहकार्य, मार्गदर्शनामुळे हे कार्य मी करू शकले त्यांचा उल्लेख व ऋण व्यक्त करणे हे माझे कर्तव्यच आहे.

या कामकाजातील प्रमुख घटक म्हणजे भोर शहरातील चार माध्यमिक शाळा या शाळांचे मुख्याध्यापक ज्यांनी हे संशोधन कार्य आपल्या शाळेत करण्यास अनुमती दिली. तसेच या शाळांमधील इयत्ता नववीला शिकविणारे शिक्षक व इयत्ता नववीचे विद्यार्थी ज्यांनी मला मुलाखत सूची, प्रश्नावली भरून दिली व कार्यक्रमामध्ये आनंदाने व उत्स्फूर्तपणे जे सहकार्य केले त्याबद्दल त्याचे मी शतशः ऋणी आहे.

संशोधन कार्याचा अहवाल लिहिणे हे अत्यंत कौशल्याचे काम आहे. अचूकतेने, नियमाच्या चौकटीत आकर्षकपणे व शुद्धतेने मांडण्यास टंकलेखक श्री.मोहन चव्हाण यांनी अनमोल सहाय्य केले त्यांची मी मनापासून आभारी आहे.

प्रस्तुत कामासाठी सहाय्यभूत ठरलेल्या ग्रंथालयांचे ग्रंथपाल, संस्थांचे संस्थाप्रमुख या सर्वांचीच मी आभारी आहे.

शेवटी माझ्या संशोधन कार्यासाठी साहाय्यभूत ठरलेल्या सर्वच लहानथोर घटकांची मी कायमची ऋणी आहे.

स्थळ : पुणे

**दिनांक :** १२-५-२०११

**(सौ.मंगला रमेश खोडस्कर)**
संशोधक